| | |
|---|---|
| | पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी– 411 018<br>कर आकारणी व कर संकलन विभाग |

# जाहीर प्रकटन

## मालमत्ता हस्तांतरण फी आकारणीबाबत

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, कर आकारणी व कर संकलन विभागामार्फत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 127 व 129 मधील तरतूदीनुसार मालमत्ता कराची आकारणी करणेत येते. आकारणी केलेल्या मालमत्तांची अनुसूची ड प्रकरण 8 कराधान नियमातील नियम 9 नुसार आकारणी पुस्तकात (असेसमेंट रजिस्टर) मालमत्तांच्या नोंदी घेणेत येतात. अशा आकारणी पुस्तकात असलेल्या नोंदीमध्ये मालमत्तांचे खरेदी / विक्री, वारसाहक्क इत्यादी मुळे हस्तांतरण झालेस त्याच्या नोंदी घेणेत येतात. मालमत्ता हस्तांतरणासाठी सध्या अर्ज प्राप्त झालेल्या वर्ष अखेरचा संपूर्ण मालमत्ता कर भरणा करुन घेऊन असेसमेंट रजिस्टरला नमूद असलेल्या करयोग्य मूल्याच्या 5% मालमत्ता हस्तांतरण फी वसूल करणेत येऊन हस्तांतरण कार्यवाही करणेत येते.

कर आकारणी व कर संकलन विभाग स्थायी स्वरुपाचे उत्पन्न मिळवून देणारा विभाग आहे. शहराचा वाढता विस्तार व होणारे नागरीकरण, नागरी सुविधा व विकास कामावर होणारा खर्च याबाबी विचारात घेतल्यास महानगरपालिकेच्या उत्पन्न वाढीसाठी उपाययोजना करणे आवश्यक आहे. राज्य शासनाने सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांना उत्पन्न वाढीचे नवीन स्त्रोत निर्माण करणेबाबत वेळोवेळी अवगत केले आहे. मालमत्ता हस्तांतरण फी पोटी महानगरपालिकेस सध्या मिळणारे उत्पन्न विचारात घेता मा.आयुक्त तथा प्रशासक,पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांचेकडील मान्य प्रस्तावानुसार मालमत्ता हस्तांतरण फी शुल्कामध्ये दिनांक 01 एप्रिल 2022 पासून खालीलप्रमाणे सुधारणा करणेत येत आहे.

1. खरेदीखत / विक्री / बक्षीसपत्र या सारखे दस्त नोंदविताना नोंदणी मुद्रांक शुल्क विभागामार्फत त्या मिळकतीचे चालू बाजारभावाचे मूल्यांकनावर आधारित किंमत ठरवून त्या किंमतीवर Stamp Duty (मुद्रांक शुल्क) वसूल करणेत येते. सन 2022-2023 पासून सदर दस्तऐवजानुसार Stamp duty (मुद्रांक शुल्क) ठरविण्यासाठी शासनाने जे बाजारमूल्य विचारात घेतले आहे, त्या बाजारमूल्याचे 0.50% मिळकत हस्तांतरण फी आकारणे येईल.

2. मयत / रक्तसंबंधी कौटुंबिक वाटणीपत्र / रक्तसंबंधी बक्षीमपत्र / वारसा हक्क प्रमाणपत्र अशा प्रकरणी जिथे प्रत्यक्ष आर्थिक व्यवहार घडून आलेला नाही तिथे शासनाने निश्चित केलेले मुद्रांक शुल्क व हस्तांतरण फी रुपये 500/- यामध्ये कमी असलेली रक्कम ही हस्तांतरण फी राहील.

3. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण 8 नियम 1 अन्वये हस्तांतरण संलेख झालेनंतर उपरोक्त 1 चे प्रकरणी 03 महिन्यात व उपरोक्त 2 चे प्रकरणी 01 वर्षाचे आत मनपास कळविणेबाबत तरतूद आहे. सदर तरतूदीचे अनुषंगाने सन 2022-2023 पासून मिळकत खरेदी /विक्री दस्तऐवजाचे दिनांकापासून तसेच मयत / कौटुंबिक वाटणीपत्राचे दिनांक पासून 01 वर्षापेक्षा जास्त कालावधी झालेस वरील देय होणा-या हस्तांतरण फी रक्कमेच्या 10% प्रती वर्ष याप्रमाणे हस्तांतरण फी विलंब शुल्क आकारणेत येणार आहे.

26/03/22

(राजेश पाटील)
आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – 411 018

जावक क्रमांक : कर/मुख्य/03/कावि/139/2022
दिनांक : 26/03/2022